<u>पुढील उलट तपास वादी यांचा प्रतिवादी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री.एल.एल.नाथगोसावी यांचेमार्फत सुरु—</u>

३३. मृत्यूपूर्वी काही दिवस सहदेव हे खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल होते या माझ्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ मी त्यांची औषधे खरेदी केली, दवाखान्याचे बील भरले याबाबतचे कागद मी याकामी दाखल करणार नाही. सहदेव मानसिकदृष्टया सुदृढ नव्हते असे जे माझे म्हणणे आहे ते मला कधी कळाले त्याची तारीख, महीना, साल मला आठवत नाही.

प्रश्न—मृत्यूपूर्वी तुमचे वडील कित्येक दिवस आजारी होते असे तुम्ही नमूद केले आहे, मृत्यूपूर्वी तुमचे वडील आजारी होते ती तारीख, महीना व साल कोणता?

उत्तर—मृत्यूपूर्वी एक महीन्यापासून माझे वडील आजारी होते.

माझे वडील दि. २१/१०/२०११ इ. रोजी मयत झाले. माझे वडिल मृत्यूपूर्वी कित्येक दिवस आजारी असल्याबाबतच्या माझ्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ मी कागद याकामी दिले असावेत कागद कसले आहेत व त्यात काय मजकूर आहे हे मला आठवत नाही. न्यायालयात कागद देताना ते मी वाचले होते का ते मला आठवत नाही. माझे वडिल मानसिकदृष्टया सुदृढ नव्हते या माझ्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ माझ्या कडे कागद आहेत. ते कागद मी वाचले आहेत. ते कागद मी न्यायालयात दिले आहेत. त्या कागदांमध्ये मजकूर काय आहे हे माझ्या लक्षात नाही.

३४. शिवाजी शांताराम परब या नावाच्या व्यक्तीला मी ओळखतो. ते माझ्या मूळ वंशावळीतील आहेत. गजानन शंकर परब, सुधाकर जिवाजी परब यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, हे दोघे देखील माझ्या मुळ वंशावळीतील आहेत. गजानन शंकर परब, भूषण रामचंद्र परब यांना मी ओळखतो. शशिकांत मारुती परब यांना मी ओळखतो. श्रीराम विठ्ठल परब यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, शशिकांत मारुती परब, श्रीराम विठ्ठल परब हे माझ्या मुळ वंशावळीतील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सुर्यकांत अनाजी परब, तानाजी अनाजी परब, भूषण रामचंद्र परब, वर्षा रामचंद्र परब, निशा रामचंद्र परब, परेश विनायक परब, शाहू परशुराम परब, अनंत विठ्ठल परब, जयांजली अनंत परब, विजय जनार्दन परब हे आमच्या मूळ वंशावळीतील आहेत.

प्रश्न—वर नमूद व्यक्तींच्या नावे गाव मौजे वाडा येथे जमीनींची खाती आहेत?

(सदर लोक हे आवश्यक पक्षकार आहेत असे प्रतिवादीचे कथन नाही या लोकांचा सहदेवशी अगर सहदेवच्या मिळकतींशी काहीही संबंध नाही. सबब सदर प्रश्न अनावश्यक आहे अशी हरकत वादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी घेतली. या उलट प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी सांगितले की वर नमूद लोकांच्या खात्यामध्ये सहदेव यांचे नाव आहे. त्यामुळे सदर प्रश्न आवश्यक आहे. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतला. प्रस्तुतचा दावा हा वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जित सदनिकेच्या वाटपाकरिता व सहदेव यांनी केलेल्या मृत्युपत्रात रद्द असल्याचा व बंधनकारक नसल्याचा अधिकार गोठवणेसाठी आहे.

नि. क्र. २० चे यादी सोबत दाखल केलेल्या खातेउता—यांमध्ये वादीचे वडील सहदेव यांचे नाव नोंद आहे, असे दिसून येते. तसेच प्रतिवादी यांनी कैफियतीमध्ये सहदेव यांच्या वडीलोपार्जित व खरेदी केलेल्या मिळकती असुन त्या मिळकतींचे खातेक्रमांक कोणकोणते आहेत याबाबत कथन केलेले आहे. सदर कथन केलेल्या खाते क्रमांकाच्या खाते उता—यांमध्ये सहदेव यांचे नाव नोंद असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रतिवादी यांनी या दाव्यास आवश्यक पक्षकार व आवश्यक मिळकतींचा अभाव आहे असे कथन केले आहे. जरी नेमक्या कोणत्या पक्षकाराचा अभाव आहे, असे स्पष्ट कथन प्रतिवादींनी केले नसले तरी देखील वर नमूद लोकांची नावे सदर खाते उता—यांमध्ये दिसून येतात. या सर्व परिस्थितीत व भारतीय पुरावा अधिनियम कलम १३८ नुसार सदर प्रश्न मुळीच अनावश्यक वाटत नाही सबब हरकत फेटाळण्यात येते.)

उत्तर—हे म्हणणे खरे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, या खात्यातील जमिनीमध्ये सहदेव यांचा हिस्सा आहे. गाव मौजे वाडा येथे सहदेव यांच्या नावे असलेल्या मिळकती आहेत. त्या मिळकतींचे सातबारा उतारे मी पाहीले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, या सातबारा उता—यांमध्ये वर नमूद लोकांची नावे नमूद आहेत.

प्रश्न—वर नमूद लोक सहदेव यांचे हिस्सेदार आहेत ?

उत्तर—सर्वच जण नाहीत, काही जण आहेत.

सहदेव व त्याचे जे काही हिस्सेदार ज्या मिळकतींमध्ये सहहिस्सेदार आहेत त्या मिळकतींचे सहदेव व त्याच्या त्या हिस्सेदारांमध्ये वाटप न्यायालयात झाले नाही याबाबत मला निश्चित सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. ४ गावी राहतो व तो कुटूंबाच्या मालमत्तेचा सांभाळ करतो असे माझे म्हणणे आहे. त्या कुटुंबाच्या मालमत्तेचे सातबारा उतारे मी याकामी सादर केले नाहीत, ते उतारे माझ्याकडे नाहीत, सहदेव व त्यांच्या सहहिस्सेदारांनी वाटपाचा दावा दाखल केला होता, त्यांच्यामध्ये वाटप झाले असा कागद मी पाहिला अगर वाचला नाही.

३५. माझ्या आईचे लग्न कधी झाले याची मला माहिती नाही. माझ्या आईचे माहेर मालवण कट्टा आहे. माझ्या मोठया भावाचे नाव प्रकाश सहदेव परब असे आहे.

प्रकाश हे पोलीस खात्यात नोकरीस होते. ते ५ ते ६ वर्षापूर्वी निवृत्त झाले असतील ते कधी नोकरीस लागले होते हे मला माहित नाही. प्रकाश हे सहा महीने मुंबईत, दोन महिने गावी असे राहायला असतात. निवृत्ती नंतर प्रकाश हे सहा महीने मुंबईत व दोन महीने गावी येवू लागले. हे म्हणणे खरे आहे की, त्यापूर्वी ते कामानिमित्त मुंबईला राहायचे हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश परब यांना माझ्या वडीलांनी पोलीसात नोकरी लावून दिली. सुधीर सहदेव परब हे माझे दोन नंबरचे भाऊ आहेत. सुधीर देखील पोलीस खात्यात नोकरीस होते. त्याला देखील माझ्या वडीलांनीच पोलीस खात्यात नोकरीस लावले. हे म्हणणे खरे आहे की, सेवा निवृत्ती नंतर सुधीर गावी येवून जावून राहू लागले. त्यापूर्वी सुधीर नोकरी निमित्त मुंबईला राहत होते. अनिल हा माझा ५ नंबरचा भाऊ आहे. त्यांचा उदयोग शेती आहे सुधीर हे अंदाजे ५ वर्षापूर्वी निवृत्त झाले असावेत. प्रकाश हे साधारणपणे कधी नोकरीला लागले हे मी नक्की सांगू शकत नाही. सुधीर हे अंदाजे कधी नोकरीला लागले हे देखील मी सांगू शकत नाही. प्रकाश नोकरीला लागले त्यावेळी मी गावी होतो. सुधीर नोकरीला लागला त्यावेळी मी गावीच होतो. अनिल व सुनिल हे जुळे आहेत. सुनिल हा खाजगी नोकरी करतो. सुनिल कधी नोकरीला लागला याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुनिल त्याच्या कामासाठी मुंबईला राहायला असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या, प्रतिवादी क्र. १ ते ५ या भावांच्या नावे स्वतंत्र घर इमले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र. ३५४अ हा इमला वाडा येथे असून तो प्रकाशच्या नावे नोंद आहे. घर क्रमांक ३५४ब हा इमला माझा मुलगा स्वप्निलच्या नावे नोंद आहे हे म्हणणे खरे आहे की, घर क्रमांक ३५४क हा इमला सुधीरच्या नावाने नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर क्रमांक ३५४ हा मूळ इमला होता व त्याचे नंतर भाग पडले. घर क्रमांक ३५४ या घर इमल्याचे घरपत्रक उतारे मी पाहिले नाहीत. घर क्रमांक ३५४ या इमल्याचे भाग पडलेले घर पत्रक उतारे मी पाहिले नाहीत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला ते माहीत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घर क्रमांक ३५४ चे भाग पडलेल्या उता—यांना माझे व प्रतिवादी क्र. १ ते ५ चे नाव नोंद आहे. प्रतिवादी क्र. ४ याच्या राहत्या घराचा घर क्रमांक मला माहित नाही. प्रतिवादी क्र. ५ च्या राहत्या घराचा घरक्रमांक मला माहित नाही. विरवाडी येथे

आंबाडयाची व्हाळी या बागेत असलेले घर प्रतिवादी क्र. ६ च्या नावे आहे हे मला माहित नाही. आंबाडयाची व्हाळी विरवाडी येथील बागेत घर आहे. सदर घर चिरेबंदी, कौलारु आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे घर अ व ब या भागात विभागले आहे. अ व ब या भागांची लांबी रुंदी प्रत्येकी ४१ X २४.५ फूट आहे याची मला माहिती नाही. हा घर इमला कधी बांधला हे मला नक्की सांगता येणार नाही. या इमल्याचे बांधकाम नवीनच करण्यात आले. हा इमला सहदेव याने त्यांच्या हयातीत बांधला. हा इमला अंदाजे किती वर्षापूर्वी बांधला हे मला नक्की सांगता येणार नाही.

३६. माझ्या माहिती नुसार आंबा कलमांचे उत्पन्न मेहनत असे त्याप्रमाणे मिळते. वाडा गावामध्ये खाली चिरेबंदी गिरण होती. सदर गिरण प्रतिवादी क्र. १ च्या नावे गाव कागदोपत्री नोंद आहे. त्या गिरणीचे नाव छाया फ्लोअर मिल असे होते. ते नाव प्रतिवादी क्र. ८ च्या नावाने ठेवले होते.

प्रश्न—सदर गिरण प्रतिवादी क्र १ हाच चालवत होता?

उत्तर—सदर गिरण प्रतिवादी क्र. १, अनिल व मी असे चालवत होतो.

हे म्हणणे खरे आहे की, सदर गिरणींचा परवाना प्रतिवादी क्र. १ च्या नावे होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर गिरण सुरु करण्याचा खर्च माझ्या वडीलांनी केला. ही गिरण माझ्या वडीलांनी कधी सुरु करुन दिली हे माझ्या लक्षात नाही. किती वर्षापूर्वी गिरण सुरु करुन दिली हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ च्या नावे गिरणींचे लायसन होते, त्या अनुषंगाने गिरणीचा मालक प्रतिवादी क्र. १ होता. सदर गिरण कधी बंद झाली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गिरण सुरु करण्याकरता वडीलांना बांधकाम करावे लागले. हे म्हणणे खरे आहे की, ही गिरण स्वतंत्र इमल्यात सुरु केली गेली.

न्यायालयाची मध्यंतराची वेळ झालेने उलटतपास मध्यंतरापर्यंत तहकूब केला.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक—११/१०/२०१८

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड.

मध्यंतरानंतर पुढील उलटतपास शपथेवर सुरु—

३७. हे म्हणणे खरे आहे की, मतीमंद असलेली छाया हिचे पालनपोषण व्हावे या उद्देशाने माझ्या वडीलांनी छाया फ्लोअर मिल सुरु केली होती. हे म्हणणे खरे आहे की, ही मिल सुरु करण्यासाठी लागणारा खर्च माझ्या वडीलांनी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी प्रतिवादी क्र. १ च्या नावावरती क्वालीस गाडी घेवून दिली होती. प्रतिवादी क्र. १ च्या नावे क्वालीस गाडी होती. प्रतिवादी क्र. १ हा चारचाकी वाहनांचे ड्रायव्हींग करतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ड्रायव्हींग करतो यामुळेच वडीलांनी क्वालीस गाडी त्याला घेवून दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, या क्वालीस गाडीचा खरेदीचा खर्च माझ्या वडीलांनी केला होता. प्रतिवादी क्र. १ याने कॉलेज सोडल्यानंतर रिक्षा चालवण्याचा व्यवसाय सुरु केला. त्याने कॉलेज कधी सोडले हे माझ्या लक्षात नाही. त्यावेळी त्याचे वय २५ वर्षे होते. वडीलांनी बॅक लोन करुन त्याला रिक्षा घेवून दिली. हे म्हणणे खरे आहे की बॅक लोन मिळण्याकरीता माझ्या वडीलांनी डाउन पेमेंट भरले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ कडे असलेली सध्याची रिक्षा त्याला वडिलांनी घेवून दिली. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ याची माटुंगा येथे खोली आहे.

प्रश्न—वडील हयात असताना प्रतिवादी क्र. १ याला रिक्षा व्यवसाय व खालची वाडा येथील नारळाची बाग या व्यतिरीक्त दुसरे उत्पन्नाचे साधन नव्हते?

उत्तर—प्रतिवादी क्र. १ याला त्याचा रिक्षा व्यवसाय एवढेच उत्पन्नाचे साधन होते.

हे म्हणणे खरे नाही की, माटुंगा येथील खोली खरेदी करायला माझ्या वडीलांनी त्याला मदत केली. हे म्हणणे खरे आहे की, माटुंगा येथील खोली खरेदी केली त्यावेळेला सदर खोली खरेदी करण्याची प्रतिवादी क्र. १ ची ऐपत नव्हती.

३८. दिनांक १५/१०/२०११ इ. रोजी मी देवगड येथे आलो होतो. त्यावेळी मी माझ्या वडीलांना भेटलो होतो. त्यादिवशी मी वडीलांसोबत दुपारी १.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत होतो. त्यादिवशी मी दुपारी १२.०० ते १२.३० वाजण्याचे दरम्याने

देवगडला आलो. माझा भाऊ अनिल देवगडला आला होता. अनिल हा माझ्या सोबतच देवगडला आला होता. दिनांक १५/१०/२०११ नंतर दुस—या दिवशी मी माझ्या वडीलांना भेटलो मी, अनिल व प्रतिवादी क्र. १ यांच्या व्यतिरीक्त आमचे अन्य भाऊ दिनांक १५/१०/२०११ इ. रोजी वडीलांना भेटायला आले नव्हते.

३९. हे म्हणणे खरे आहे की, वीरवाडी येथील आंबाडयाची व्हाळी या जमीनीमध्ये आम्हा भावांना वडीलांच्या मृत्युनंतर हक्क मिळाला. वडीलांनी वादग्रस्त दावा मिळकत फ्लॅटचे खरेदीखत केले त्यावेळी निबंधक कार्यालयात मी हजर नव्हतो. माझ्या म्हणण्यानुसार वडीलांची शुध्द दिनांक १५/१०/२०११ इ. रोजी ॲडमीट केल्यापासून हरपली होती वडीलांना डॉ. बोरफळकर यांच्याकडे ॲडमीट केल्याबाबतचे कागदोपत्री पुरावे मी सादर केले नाहीत. दि. १५/१०/२०११ इ. रोजी वडीलांची प्रकृती चांगली नव्हती याबाबत कागदोपत्री पुरावा मी याकामी दिला नाही. त्यांची शुध्द हरपली होती. याबाबतचे कागदोपत्री पुरावे मी दिले नाहीत. वीरवाडी येथील आंबाडयाची व्हाळी याबागेत आंबा कलमे कोणत्यावर्षी लावली याची मला माहिती नाही, कारण त्यावेळी मी वयाने लहान होतो. त्यावेळी मी १० ते १२ वर्षाचा होतो. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळी या ठिकाणी असलेला घर इमला माझ्या वडीलांनी बांधला व त्यासाठीचा खर्च वडीलांनीच केला. सदर बागेमधील कलमांची जोपासना, मशागत वगैरे खर्च माझ्या वडीलांनीच केला. प्रकाश हा माझ्यापेक्षा ४ वर्षाने मोठा आहे. सुधीर हा माझ्या पेक्षा ३ वर्षानी मोठा आहे. अनिल व सुनिल हे माझ्या पेक्षा लहान आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझा भाऊ अनिल सदर छाया फ्लोर मिल प्रतिवादी क्र. १ चे नोकर म्हणून चालवत होतो. वीरवाडी येथील जागा आमच्या कुटूंबाकडे कशी आली हे मला माहित आहे. सदर जागा वडीलोपार्जित आहे असे माझे म्हणणे आहे. ही जागा आमच्या पणजोबांपासून चालत आली आहे असे माझे म्हणणे नाही. ही जागा आमचे आजोबा रावजी यांच्यापासुन चालत आली आहे असे माझे म्हणणे आहे. या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ मी याकामी कागदपत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ हा त्याच्या कुटूंबासह दावा मिळकत फ्लॅटमध्ये राहतो. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत फ्लॅटचा ताबा प्रतिवादी क्र. १ कडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाडा घर क्र. ३५४ हे घर

माझ्या वडीलांनी बांधले व त्याचा खर्च वडीलांनीच केला. माडाच्या बागेमध्ये देखील घर इमले आहेत. हे देखील घर इमले माझ्या वडीलांनी बांधले व त्याचा खर्च वडीलांनीच केला.

४०. सुनिल हा मुंबईला खाजगी वाहनावर ड्रायव्हींग करत होता आता करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वडील पोलीस सेवेत असताना त्यांना क्वार्टर्स मिळाले होते. त्याठिकाणी वडिलांसोबत माझे भाऊ राहत होते. हे म्हणणे खर आहे की, माझे वडील निवृत्त होण्याच्या आसपास माझ्या वडीलांनी विरार येथे माझ्या आईच्या नावे फ्लॅट खरेदी केला. वडीलांनी हा फ्लॅट लवांकुश अपार्टमेंट, तिसरा माळा, रुम नं. ३०, मयेकरवाडी, विरार वेस्ट येथे घेतला होता. सुनिल हा आज रोजी याचा फ्लॅटमध्ये राहतो. प्रतिवादी क्र. १ याचे हृदयाचे ऑपरेशन झाले आहे. त्याच्या हृदयाला व्हॉल्व बसवला आहे. त्याच्या हृदयाचे झडपेचे ऑपरेशन झाले आहे. सदर ऑपरेशनचा खर्च माझ्या वडीलांनीच केला. त्यावेळेचा रुपये दीड लाख खर्च आला होता. सुनिल याने विरार येथील मयेकर बिल्डरला मारले होते व त्याला अटक झाली होती याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील वाडा येथे रहात होते तेव्हा ते प्रतिवादी क्र. १ सोबत रहात होते. वडिलांनी दावा मिळकत खरेदी करताना खरेदी रक्कम विकासकाला रोख दिली कि चेकने दिली याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा साठेखत करार कधी झाला याची मला माहिती नाही. असा साठेखत करारपत्र कधी झाला हे माझ्या लक्षात नाही. हा साठेखत करारपत्र किती रक्कमेला झाला याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये सदरचा तथाकथित मृत्युपत्राचा लेख प्रतिवादी क्र. १ ने तयार करुन घेतला असे नमूद केले आहे, तो मृत्युपत्राचा लेख म्हणजे नि. ७९ च्या कागद यादी सोबत दाखल केलेला लेख आहे. निशाणी क्रमांक ७९ सोबत दाखल असलेल्या मृत्युपत्रातील पान क्र. ३ व ७ वर असलेला फोटो माझ्या वडीलांचाच आहे. हे म्हणणे खरे आहे की, आंबाडयाची वहाळी या बागेतून मिळणारे उत्पन्न आम्ही सर्व भावंडे आज रोजी वाटून घेतो. निशाणी क्रमांक ७९ च्या यादी सोबत असलेले मृत्युपत्र मी रद्द करुन मागितलेले व बंधनकारक नसलेले मृत्युपत्र नाही.

प्रश्न : निशाणी क्रमांक ७९ सोबतचे मृत्युपत्र चुक आहे की बरोबर आहे याची तुम्हाला माहिती नाही ?

उत्तर : हे मृत्युपत्र चूक आहे.

नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९ /२०१३
निशाण क्र. ५६ लगत

निशाणी क्रमांक ७९ च्या यादीसोबत असलेले मृत्युपत्र मी वाचून पाहिले आहे. यामृत्युपत्रातील मजकूर आज माझ्या लक्षात नाही. दाव्यात नमूद केलेले मृत्युपत्र मी कधी वाचले हे माझ्या लक्षात नाही. निशाणी क्रमांक ७९ सोबत दाखल केलेले मृत्युपत्र मी शेवटचे कधी वाचले हे माझ्या लक्षात नाही. हे मृत्युपत्र मी किती दिवसापूर्वी वाचले होते ते देखील मला आठवत नाही. निशाणी क्रमांक ७९ सोबतच्या मृत्युपत्रावर कोणाचे अंगठे व सहया आहेत याची मला माहिती नाही. दाव्यात नमूद केलेल्या मृत्युपत्रावर कोणाचे अंगठे व कोणाच्या सहया आहेत हे माझ्या लक्षात नाही. दाव्यात नमूद केलेल्या मृत्युपत्रामध्ये छाया हिच्याबाबत मजकूर नमूद केला होता की नव्हता हे मला आठवत नाही. निशाणी क्र. ७९ सोबतच्या मृत्युपत्रामध्ये छायाबाबतचा मजकूर नमूद नाही. दाव्यामध्ये नमूद केलेल्या मृत्युपत्रावर साक्षीदार म्हणून कोणी सहया केल्या याची मला माहिती आहे. वसंत महादेव पुजारे, नाडण याला मी ओळखतो. वसंत महादेव पुजारे ही व्यक्ती मला भेटली होती. मला ही व्यक्ती एकदाच भेटली होती. वसंत पुजारे या व्यक्तीला घेवून मी देवगड तहसिल कार्यालयात गेलो होतो का हे मला आठवत नाही. मी वसंत पुजारे याला घेवून तहसिल कचेरीत गेलो व ॲफीडेव्हीट करुन घेतले असे घडले नाही. मी राजाराम मालोजी भाबल याला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वसंत पुजारे याचा उद्योग शेती व मोलमजूरी आहे. तो माझ्याकडे व अनिलकडे मोलमजूरीला आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ७९ सोबत असलेला दस्त चुक आहे असे मी म्हणतो कारण तो बरोबर आहे असे म्हटल्यास मला दावा मिळकतीत हिस्सा मिळणार नाही.

४१. माझ्या वडीलांनी केलेले अंतिम खरेदीपत्र मी पाहिले नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, माझ्या वडीलांनी केलेले अंतिम खरेदीपत्र मी पाहिले आहे. त्या खरेदीपत्रावर माझ्या वडीलांच्या सहया व अंगठे आहेत. त्या खरेदीपत्रावर प्रतिवादी क्रमांक १ यांची साक्षीदार म्हणून सही नाही. माझ्या वडीलांची मृत्युची तारीख २१/१०/२०११ ही आहे. हे म्हणणे खरे आहे की, विरवाडी येथील आंबाडयाची वहाळी ही मिळकत माझ्या आईच्या नावे खरेदीची आहे. या खरेदीसाठी लागणार पैसा माझ्या वडीलांनी पुरवला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांना प्रतिवादी क्र. १ बद्दल विशेष प्रेम होते. हे म्हणणे खरे आहे

की, मी, महेंद्र व अनिल राहायला कायमस्वरुपी गावीच होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचा त्यांच्या हयातीत प्रतिवादी क्र. १ वर जास्त विश्वास होता. हे म्हणणे खरे नाही की, वडीलांच्या मृत्युनंतर आजपर्यंत छाया ही प्रतिवादी क्र. १ सोबत रहायला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी आपण प्रतिवादी क्र. १ च्या सातपायरी येथील घरी गेलो असता त्याठिकाणी छाया आहे. एकत्र कुटूंबाच्या मिळकतीतून उत्पन्न मिळते असे जे माझे म्हणणे आहे त्याच्या पुष्ठयर्थ मी कागदपत्र व हिशोब याकामी दिले नाहीत. एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून दावा मिळकत खरेदी केली असे माझे म्हणणे आहे असा ठराव होवून मिळणेसाठी मी मागणी केली नाही.

न्यायालयाची कामकाजाची वेळ संपलेने पुढील उलटतपास पुढील तारीख पर्यंत तहकूब केला.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक :— ११/१०/२०१८

सही/—
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
देवगड